# शरद नरेश : वर्गीकरणा पलीकडची कविता

◆ डॉ.वासुदेव सावंत

शरद नरेश ही आजच्या मराठी साहित्यातील फार लोकप्रिय किंवा बहुचर्चित नाममुद्रा नसली तरी साहित्याच्या अनेक जाणकार रसिकांना आपलं एक स्वतंत्र अस्तित्व मराठी साहित्यात उमटवून राहिलेला महत्त्वाचा लेखक म्हणून ते परिचित आहेत. खरे तर इतर अनेक लेखक-कवींप्रमाणे प्रसिद्धी,लोकप्रियता अशा गोष्टींचा फारसा विचार न करता स्वत:ला शब्दांतून आविष्कृत करीत राहणारा हा गोमंतकीय लेखक -कवी आहे. नरेंद्र बोडके, शरद नरेश या गोमंतकीय कवी-लेखकांचा परिचय मला सत्यकथा मासिकातून प्रथम झाला. शरद नरेश यांच्या कविताही अधूनमधन सत्यकथेतून येत असल्या तरी माझ्या मनावर त्यांची प्रतिमा एक वैशिष्ट्यपूर्ण कथाकार म्हणूनच उमटलेली आहे. पण आपल्या कथा, कविता संग्रहरूपाने प्रकाशित व्हाव्यात, काही ठोस स्वरूपात आपण वाचकांपुढे यावे याविषयी ते काहीसे उदासीनच राहिले. स्वत:ला साहित्यातून व्यक्त करून त्या आत्माविष्काराच्या आनंदाचेच सुख अनुभवणे हीच खऱ्या जातिवंत लेखकांची वृत्ती असते. शरद नरेश याच प्रवृत्तीचे एक आत्ममग्न लेखक आहेत. पुस्तकरूपात त्यांचे साहित्य नसल्याने त्यांच्या साहित्याची समीक्षाही लोकांपुढे फारशी आलेली नाही. योगायोगाने अलीकडेच त्यांच्या १४-१५ कविता एकत्रितपणे माझ्या वाचनात आल्या. त्यातून पूर्णांशाने नसली तरी कवी म्हणून त्यांची काहीएक ओळख झाली. या कविता वाचल्यावर झालेली प्रतिक्रिया नोंदवाविशी वाटत होतेच. पण नरेंद्र बोडके यांच्यासारख्या कविमित्राच्या आग्रहाने शरद नरेशांच्या कवितांवर लिहायला भागच पाडले. म्हणून माझ्यापुढे असलेल्या त्यांच्या कवितांवर हे प्रतिक्रियास्वरूप छोटे टिपण लिहीत आहे.

१९७०च्या दशकात सत्यकथेतून मराठी कवी-लेखकांची एक नवी पिढी पुढे येत होती. त्यातले शरद नरेश हे एक लक्षणीय नाव. त्यामुळे मराठी साहित्यातले ते साठोत्तरी कवी-लेखक आहेत. १९६०नंतरच्या काळात मराठी साहित्य तत्पूर्वीच्या तुलनेत अनेक अंगांनी बदलले असल्याने समीक्षकांनी साठोत्तर साहित्य किंवा साठोत्तरी लेखक-कवी असे शब्द नव्या जाणिवेचे सूचक म्हणून वापरलेले आहेत. कवितेपुरताच विचार करायचा तर १९६०नंतर मराठी कवितेचा एक नवा टप्पा सुरू झालेला दिसतोच, पण आशय आणि संवेदनशीलतेच्या पातळीवर मराठी कविता अधिक बहुमुखी झालेली दिसते. एकीकडे लघुअनियतकालिकाच्या चळवळीशी संबंधित असलेल्या कवींच्या कवितांचा एक प्रवाह साठोत्तर कवितेत दिसतो, तर दुसरीकडे दलित आणि सामाजिक जाणिवेचा आविष्कार करणारी कविता अधिक प्रभावी झालेली दिसते. चित्रे-कोल्हटकरांची उत्तर आधुनिक जाणिवेशी नाते सांगणारी कविता एकीकडे तर नामदेव ढसाळांची विद्रोही जाणीव आणि नारायण सुर्वे यांच्या कवितेतील संयत पण व्यापक सामाजिक जाणीव यांनी साठोत्तर कविता मोठ्या प्रमाणावर प्रभावीत झालेली आहे. १९९० नंतरची जागतिकीकरण आणि माहितीक्रांतीच्या युगातली कविता काही नवे वळण घेताना दिसते. कवितेतल्या दुसऱ्या-तिसऱ्या नवतेची चर्चाही सुरू असलेली दिसते. पण शरद नरेश यांची कविता वाचल्यावर लक्षात येते की त्यांच्या कवितेवर अशा कुठल्याही एका प्रवाहाचा किंवा प्रभावाचा शिक्का मारता येण्यासारखा नाही. गोमंतकात राहणारे एवढ्या अर्थानेच त्यांना गोमंतकीय कवी म्हणता येईल. पण ज्या अर्थाने गोमंतकीय साहित्य हा शब्द वापरला जातो त्या अर्थाने त्यांची कविता गोमंतकीय आहे असेही म्हणता येणार नाही. सामाजिक कविता, प्रेमकविता, निसर्ग कविता किंवा अमुक एका विशिष्ट जाणिवेची कविता अशी वर्गवारी करूनही त्यांच्या कवितेचे आकलन करता येणार नाही. असल्या सगळ्या रुढ वर्गीकरणाबाहेर राहून आणि कोणत्याही कवीच्या प्रभावाखाली न येता शरद नरेश स्वत:च्या कवितेची वाट स्वतंत्रपणे शोधणारे कवी आहेत.

कविता हा कवीचा आत्मोद्गार असतो किंवा टी.एस. इलियटने म्हटल्याप्रमाणे कविता हा कवीचा पहिला आवाज असतो. कवितेत कवी स्वत:शीच बोलत असतो. जगताना क्षणोक्षणी जे पाहिलं, जाणवलं, भावलं त्याची अर्करूपे भावनोत्कट क्षणी कवितेच्या रूपाने व्यक्त होत असतात. अशा प्रकारे कुठल्यातरी माध्यमातून स्वत:ला व्यक्त करणे हाच जगण्याचा सच्चेपणा (Authenticity) किंवा जगण्याची

अर्थपूर्णता असते. म्हणूनच An authentic Rembraundt is the picture that he himself painted असं चित्रकार रेम्ब्रॉबद्दल एका अस्तित्ववादी समीक्षकाने म्हटलेले आहे. शरद नरेश यांच्या कविता वाचताना हे वाक्य मला आठवले. कारण त्यांची कविता ही 'स्व'च्या सच्च्या जगण्याचा शोध घेणारी कविता आहे हे जाणवते. म्हणूनच अमुक एक विषय निवडून त्यावर लिहिलेली कविता असे त्यांच्या कवितेचे स्वरूप नसते. जगताना वेगवेगळ्या क्षणी प्रकट झालेला त्यांचा भावोद्‌गार असतो. त्यांची कविता ही अशी एका अर्थाने त्यांच्या आत्मशोधाची कविता असते. त्या दृष्टीने आता माझ्यापुढे असलेल्या त्यांच्या 'जन्म' आणि 'माझेपण असण्याचा...' या दोन कवितांचा उल्लेख करेन. कवितेच्या जन्माचा अनुभव कसा दिव्य, अनादी, अनामिक आणि प्रकाशमय असतो, हे सांगताना

तशी कविता मस्तकी धारण करून
निरांजनाची वात
प्रज्वलित करण्याच्या
अस्तित्वापुरता मी

असं लिहितात तेव्हा आपलं अस्तित्व कवितेच्या जन्माशी ते निगडित करताना दिसतात. कवितेशिवाय आपली अस्तित्वशून्यताही ते इथे सुचवून ठेवतात. कवितेच्या प्रकाशगर्भ अनुभूतीचे वर्णन करताना या कवितेतील प्रभा, ज्योत, वात (निरांजनाची / समईची) ह्याच प्रकाशासंबंधी प्रतिमा 'माझेपण असण्याचा' या कवितेतही येतात. एकेकाळी उजळलेल्या पण मध्ये काहीकाळ विझलेल्या ज्योती पुन्हा एकवार स्वत:च समई होऊन पेटवाव्यात असे कवीला वाटते. ज्योती उजळण्याचा हा क्षण कवीला आपल्या असण्याची सार्थता पटवून देणारा वाटतो.

एकांतातला प्रकाश, सभोवार
बंदिस्त गर्भागारात, गंभीर
एकमेव क्षण
तोच मी ———————— माझेपण असण्याचा गौरव

ज्योती उजळण्याचा क्षण म्हणजे कवितेचा जन्म आणि कवीचे असणे हे वेगळे नाही हे या दोनही कवितांतून स्पष्टपणे प्रतीत होते.

एकीकडे आपल्या खऱ्या जगण्याचा कवितेतून शोध घेणारा कवी प्रत्यक्षातल्या जगण्याच्या अनुभवाने भ्रान्त व भिरभिरा झालेला आहे. जीवनाचे नेमके आकलन होत नाही, जगण्याची निश्चित दिशा सापडत नाही ही खंत

भिरभिऱ्या मनाला दिशा घावेना
घावलेली दिशा ठाव गाठेना

अशा सरळ साध्या भाषेत कधी व्यक्त होते -घावेना हा बोलीभाषेतला वैशिष्ट्यपूर्ण शब्द वापरून (मन भिरभिरे) तर कधी भौतिक सुखाच्या शोधात धडपडणारे उर्मट, उत्पाती आयुष्य कवीला जगण्याचा विचित्रपणा जाणवून देते. एकीकडे लौकिकदृष्ट्या आपण परिपूर्ण आहोत असे वाटणाऱ्या कवीला 'का बरे असावे मी अपरिपूर्ण हा' प्रश्न सतावत राहतो. 'व्यर्थ वैकुंठी' या कवितेत जीवनाविषयी कवीचा एक वैशिष्ट्यपूर्ण दृष्टिकोन व्यक्त झालेला आहे. स्वत:चा निर्णय न घेता, स्वत:च्या मनाप्रमाणे जगावेगळे काही न करता लोटांगणप्रवृत्तीने जगणे म्हणजे मरण असे कवीला वाटते. म्हणून चाकोरीबद्ध न जगता

जिणे आडवे तिडवे
उभे वाकडे फाकडे
खूळ आंधळे पोसावे

अशी जगण्याची पद्धती कवीला महत्त्वाची वाटते. इथे जगण्याच्या संदर्भात कवी आपली अस्तित्ववादी जाणीवच व्यक्त करताना दिसतो.

इथे माझ्यापुढे असलेल्या शरद नरेश यांच्या 'उडणारे पक्षी', 'वारा इरादा', 'वाळवंटाच्या मनात...', 'हरीची हिरवळ', 'ओसरला अन् पाऊस' या कविता निसर्गप्रतिमेभोवती केंद्रित झालेल्या असल्या तरी रुढार्थाने त्या निसर्गकविता नाहीत. निसर्गातल्या या गोष्टींची कविमनावर कोरलेली मानसचित्रेच या कवितांमधून व्यक्त होतात आणि केवळ निसर्गानुभव व्यक्त करण्याच्या पलीकडे या कविता जातात. मांडणीच्या दृष्टीनेही या कविता वैशिष्ट्यपूर्ण आहेत. अचानक दिशा बदलणाऱ्या, वाहवत जाणाऱ्या वाऱ्याची शाश्वती देता येत नाही असे सांगणाऱ्या 'वारा इरादा' या कवितेत वाऱ्याच्या अनेकविध स्थिती आणि अवस्था कवी किती सूक्ष्मपणे टिपतो हे पाहण्यासारखे तर आहेच. पण वारा ही प्रतिमा संपूर्ण कवितेला अशी व्यापून राहते की ही प्रतिमाच काव्याशय बनून जाते. 'वाळवंटाच्या मनात' या कवितेत कवीच मन आणि वाळवंटाच मन यात फरक राहिलेला दिसत नाही. कविमनाला जाणवलेले

वाळवंटाचे द्विविध स्वरूप व्यक्त करतानाच कविमनातला वाळवंटाचा मोह ही कविता दाखवते. वाळवंटाच्या खूप खाली आणि वाळवंटाच्या खूप वर अशा दोन टोकांमधला तोल या कवितेच्या रचनारूपातूनच साधला जातो.

वाळवंटाच्या
खूप
खोल
खाली
वाटळवंटाचा थकवा

वाळवंटाच्या
खूप
उंच
वर
पक्षांचा थवा

हा वैशिष्ट्यपूर्ण रचनाबंध कवितेच्या आशयाला कसा पेलून धरतो हे पाहण्यासारखे आहे.

'उडणारे पक्षी' या कवितेत खाली हिरवा हिरवा मळा आणि वरची गडद निरभ्र निळाई या पार्श्वभूमीवर उडणाऱ्या पक्ष्यांचे कविमनावर कोरलेले चित्र उभे राहते.

उडता उडताच उडणारा पक्षी
पक्षी उडता उडताच उडणारा

ही पुनरावृत्ती कविमनावर कोरलेल्या या चित्राची प्रभावी अभिव्यक्ती करते.

'ओसरला अन् पाऊस' या कवितेत पाऊस ओसरण्याची वेळ हाच काव्याशय आहे. या वेळेचे चित्र उभे करतानाच अशा वेळी कवीच्या मनात दाटून आलेल्या स्मृती आणि दर्दनशा वाचकाला जाणवून देतात. रचनादृष्ट्याही ही कविता लक्षवेधक आहे. एकूण चार कडवी असलेल्या या कवितेत 'ओसरला अन् पाऊस' हा जाड ठशात लिहिलेला चरण पुनरावृत्त होतो आणि कवितेला एक खास लय प्राप्त होते. 'हरीची हिरवळ' असे अनुप्रासात्मक शीर्षक असलेली कविता कविमनाला जाणवलेली हिरवाईची नवलाई फार प्रभावीपणे व्यक्त करते. नेहमीच्या आपल्याला निसर्गकविता म्हणून परिचित असणाऱ्या कवितेपेक्षा रचनादृष्ट्या ही कविता फार नावीन्यपूर्ण आहे. वाक्य किंवा विधानात्मक ओळींऐवजी एकेका स्वतंत्र शब्दाची वैशिष्ट्यपूर्ण मांडणी करीत संपूर्ण कविता साकारते.

वनराई ———— हिरवी
गिरवी ———— नवलाई
नवलाई ———— मिरवी
हिरवी ———— वनराई
नव-नवलाई ———— वन-वनराई

हा रचनाबंध कागदावरील कोऱ्या अवकाशाचाही हेतुपूर्वक वापर करतोच पण हिरवी, गिरवी, मिरवी, वनराई, नवलाई या शब्दांतील नादरूपांची लय कशी पकडतो हेही लक्षात येते.

माझ्यासमोर असलेल्या शरद नरेश यांच्या 'स्त्री : एक शैली', आणि 'उत्तर : मुंगीएवढा प्रश्न' या दोन त्यांच्या अन्य कवितांच्या तुलनेत थोड्याशा दीर्घ असणाऱ्या कविता स्वतंत्रपणे विस्ताराने विचार करण्यायोग्य आहेत, पण या टिपणात त्यांचा फार विस्ताराने विचार करण्याऐवजी त्या कवितांसंबंधी काही निरीक्षणे इथे नोंदवता येतील. 'स्त्री : एक शैली' ही कविमनाला भावलेल्या स्त्रीरूपाच चित्र रेखाटणारी कविता केवळ रोमँटिक दृष्टिकोन बाजूला ठेवते. पु.शि.रेगे यांच्यासारखे केवळ स्त्रीरूपाचेच चिंतन करणारे कवी स्त्रीचे सर्जकरूप कवितेतून प्रामुख्याने उभे करतात. पण शरद नरेश यांची स्त्रीकडे एक शैली म्हणून पाहणारी दृष्टी स्त्रीचे, नारीदेहाचे आणि स्त्रीपुरुष नात्याचे एक वेगळे रूप या कवितेतून साकार करते. या कवितेच्या तुलनेत 'नेत्र : निळे पवित्र' ही कविता काहीशी रोमँटिकतेला जवळ जाणारी वाटू शकेल, पण या कवितेलाख भारून टाकणारा निळेपणा रसिकांचे लक्ष वेधून घेतल्याशिवाय राहत नाही.

'हरीची हिरवळ' ही कविता एकेका स्वतंत्र शब्दांच्या विशिष्ट मांडणीतून आकाराला येते तर त्याउलट 'उत्तर : मुंगी एवढा प्रश्न' ही कविता निवेदनात्मक मांडणीतून सुरू होते. या कवितेचे शीर्षकच लक्षवेधक आहे. (शरद नरेश यांच्या अनेक कवितांची शीर्षकेच अशी वेगळी व अर्थपूर्ण आहेत.) या कवितेतली मुंगी हे एक प्रतीक आहे. या मुंगीच्या प्रतीकातून कवी जीवनाविषयीची त्याची एक विशिष्ट अनुभूती मांडू पाहतो आणि घटनात्मक वर्णनाने सुरू होणारी कविता जीवनचिंतनाच्या एका सखोल पातळीवर जाते. माणसाला भेडसावणारी भीती आणि जीवनाविषयीचे विक्राळ प्रश्न साध्या साध्या प्रसंगातून आणि घडामोडी माणसाला कसे घेरून राहतात हे या कवितेतून कवीला सांगायचे असावे असे

वाटते. वाचकाला अंतर्मुख करण्याचे सामर्थ्य या कवितेत नक्कीच आहे.

शरद नरेश यांच्या कवितांचे हे स्वरूप पाहताना कोणत्याही एका आशयकेंद्राभोवती ही कविता फिरत नाही. तसेच प्रारंभी उल्लेख केल्याप्रमाणे कोणत्याही एका साच्यात किंवा प्रवाहात तिला बसवता येत नाही. स्वत:चा चेहरा असलेली ही कविता आहे. शरद नरेश यांच्या कवितेचे मला जाणवलेले आणखी एक ठळक वैशिष्ट्य इथे नोंदवावेसे वाटते. अन्य साहित्यप्रकारांपेक्षा कवितेमध्ये भाषेचा वापर अधिक वैशिष्ट्यपूर्ण असतो. कविता एक भाषिक क्रीडा असते असे म्हटले जाते. याचा अर्थ अन्य प्रकारच्या साहित्यात भाषा ही अर्थाभिव्यक्तीचे साधन असते पण कवितेत भाषा ही नुसती साधन राहत नाही ती कवितेचे माध्यम होत असते. त्यामुळे इतर कलांमध्ये माध्यमद्रव्य हे कलाकृतीचा भाग बनते तशी कवितेत भाषा ही नुसती आशय व्यक्त करण्याचे साधन राहत नाही. त्यामुळे भाषेच्या अर्थस्तराबरोबरच भाषेचे ध्वनिरूप किंवा नादरूप, लेखनरूप, शब्दरूप, व्याकरणरूप या भाषेच्या बाह्यस्तरावरील गोष्टींची वैशिष्ट्येही आशय व्यक्त करण्यासाठी कवितेत महत्त्वाची ठरत असतात. शरद नरेश यांच्या कवितेत भाषेच्या ध्वनि-नादरूपाचा, संहितेच्या मांडणीचा, लेखनरूपाचा जाणीवपूर्वक वापर केलेला दिसतो. रचनेच्या किंवा लेखनरूपाच्या दृष्टीने काही वैशिष्ट्यपूर्ण उदाहरणांचा वर निर्देश केलेलाच आहे. आणखी काही उदाहरणांचा इथे उल्लेख करता येईल.

'रडू आले' ही संपूर्ण कविता रिते, अंध, मंद, थंड अशा दोन अक्षरी शब्दांनीच बनलेली आहे. 'सोडताना' आणि 'जोडताना' एवढे दोनच चार अक्षरी शब्द येतात पण तेही यमक साधून 'स्त्री : एक शैली' या कवितेत विरामचिन्हांचा वैशिष्ट्यपूर्ण वापर दिसतो. नादसाम्य असणाऱ्या यमकात्मक शब्दांचा वापर तर जवळजवळ सगळ्याच कवितांतून दिसतो. तर 'कंठ फुटलेला कंठगळा', 'कोऱ्या करकरीत काव्यकळा' यासारखी नादानुप्रासात्मक रचना अनेक ठिकाणी दिसते. शब्दांच्या, ओळींच्यामध्ये जाणीवपूर्वक सोडलेली जागा, शब्दांची हेतुत: केलेली पुनरावृत्ती, विशेषणांचा वापर अशा वैशिष्ट्यांचाही स्वतंत्रपणे विचार करता येऊ शकतो. शरद नरेश यांची कविता संग्रहरूपाने आल्यावर त्यांच्या काव्यलेखनाची वैशिष्ट्ये अधिक साकल्याने पाहता येतील.

